नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# मुंबईत घरांच्या खरेदीत वाढ



- ऑगस्टमध्ये १२,५०० मालमत्तांची नोंदणी
- स्टॅम्प ड्युटीतून १,१२३ कोटींचा महसूल

**स्वीटी भागवत/मुंबई :** मुंबईतील गृहनिर्माण क्षेत्रात यंदाच्या ऑगस्ट महिन्यात जोरदार तेजी पाहायला मिळत असून, महिनाभरात तब्बल १२,५०३ मालमत्तांची नोंदणी होण्याचा अंदाज 'नाइट फ्रँक इंडिया'च्या विश्लेषणातून व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत यात ११ टक्क्यांची वाढ झाली असून, मागील १४ वर्षांतील ऑगस्ट महिन्यातील ही सर्वोच्च नोंदणी ठरणार आहे.

मालमत्ता नोंदणीच्या या तेजीमुळे महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीत ऑगस्ट महिन्यात सुमारे १,१२३ कोटी रुपयांचा महसूल स्टॅम्प ड्युटीच्या माध्यमातून जमा होण्याचा अंदाज आहे, जो गेल्या वर्षापेक्षा १२ टक्क्यांनी अधिक आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट २०२५ मध्ये ११,२३० मालमत्तांची नोंदणी झाली होती आणि १,००० कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता.

मागील महिन्याच्या तुलनेत ऑगस्टमध्ये मालमत्ता नोंदणीत १० टक्के आणि महसुलात ११ टक्क्यांची घट झाली आहे. जुलै महिन्यात १३,८२४ मालमत्तांची नोंदणी होऊन १,२५५ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. मात्र, वर्षानुवर्षाची तुलना करता घरांची मागणी मजबूत असल्याचे स्पष्ट होते. 'नाइट फ्रँक इंडिया'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शिशिर बैजल यांनी सांगितले की, मासिक आकडेवारीत काही प्रमाणात घट दिसत असली तरी वार्षिक वाढीचा दर गृहनिर्माण क्षेत्रातील भक्कम मागणी अधोरेखित करतो.

मागील एका दशकातील आकडेवारी पाहता मुंबईतील रिअल इस्टेट क्षेत्राचा मोठा विस्तार झाला आहे. ऑगस्ट २०१३ मध्ये मुंबईत अवघ्या ४,७७९ मालमत्तांची नोंदणी झाली होती आणि २३९ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. ऑगस्ट २०२३ मध्ये पहिल्यांदाच नोंदणीचा आकडा १० हजार पार (१०,९०२) गेला. ऑगस्ट २०२४ मध्ये ही संख्या ११,६३१ होती.

'नारडेको महाराष्ट्र'चे अध्यक्ष आणि 'सृष्टी ग्रुप'चे सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक कमलेश ठाकूर यांनी सांगितले की, "मजबूत आर्थिक गती आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे मुंबईतील गृहनिर्माण क्षेत्रावर ग्राहकांचा विश्वास कायम आहे. आगामी सणासुदीच्या काळात ही मागणी आणखी वाढण्याची शक्यता आहे."

'द गार्डियन्स रिअल इस्टेट ॲडव्हायझरी'चे सह-संस्थापक राम नाईक यांनी नमूद केले की, "सातत्यपूर्ण होणारे मोठे व्यवहार हेच दर्शवतात की शहरी खरेदीदारांसाठी मालमत्ता खरेदी ही सर्वोच्च प्राथमिकता आहे."

### ऑगस्ट महिन्यातील गेल्या १४ वर्षांतील नोंदणी

| साल | नोंदणी | महसूल (कोटी) |
|---|---|---|
| २०१३ | ४,७७९ | २३९ |
| २०१४ | ५,०३१ | २९७ |
| २०१५ | ५,५७३ | ३४७ |
| २०१६ | ५,४४४ | ३२४ |
| २०१७ | ४,८८६ | ३४८ |
| २०१८ | ६,८६२ | ४२ |
| २०१९ | ५,८७३ | ५०० |
| २०२० | २,६४२ | १७६ |
| २०२१ | ६,७८४ | ४२१ |
| २०२२ | ८,५५२ | ६४४ |
| २०२३ | १०,९०२ | ८१० |
| २०२४ | ११,६३१ | १,०६२ |
| २०२५ | ११,२३० | १,००० |
| २०२६ | १२,५०३ | १,१२३ |

# बँक निवडणुकीत शिंदे गटासमोर मोठे आव्हान

## मुंबई बँकेच्या आगामी निवडणुकीत स्वतंत्र पॅनल उभे करण्याच्या तयारीत

**मुंबई :** भाजपचे वर्चस्व असलेल्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीत स्वतंत्र पॅनल उभे करण्याच्या हालचाली शिंदे गटामार्फत सुरू झाल्या आहेत. मात्र, या निवडणुकीत स्वतंत्रपणे उतरण्याची तयारी करणाऱ्या शिंदे गटासमोर सक्षम नेतृत्व आणि सहकार क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांची कमतरता हे मोठे आव्हान ठरण्याची चर्चा आहे.

राज्यात सत्तेत एकत्र असलेल्या महायुती सरकारमधील भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेमध्ये सहकार क्षेत्रातील निवडणुकीवरून राजकीय सामना रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना मुंबई बँकेच्या आगामी निवडणुकीत स्वतंत्र पॅनल उभे करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे मुंबई बँकेच्या निवडणुकीत भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये थेट लढत पाहायला मिळू शकते. भाजपच्या तुलनेत मुंबईतील सहकार क्षेत्रात शिंदे गटाची ताकद आणि अनुभवी नेतृत्वाची उणीव यामुळे निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यताही व्यक्त होत आहे.

मुंबई बँकेची निवडणूक डिसेंबर किंवा जानेवारीमध्ये होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शिंदे गटाने स्वबळावर पाच जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे शिंदे गटाने मुंबई बँकेकडे मोर्चा वळवला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेले आमदार प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांचा बँकेच्या राजकारणात मोठा प्रभाव आहे. २०२१ मध्ये झालेल्या मुंबई बँकेच्या निवडणुकीत प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने सर्वच्या सर्व २१ जागांवर विजय मिळवला होता. आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी शिंदे गटामार्फत निवडणूक लढविण्याच्या हालचाली सुरू आहेत. मात्र राजकीय आणि सहकारी समीकरणे यासोबतच सहकार क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांच्या कमतरतेमुळे शिंदे गटासाठी ही निवडणूक सोपी नसल्याचे जाणकारांचे मत आहे.

सहकार क्षेत्रात भाजपकडे अनेक वर्षांचा अनुभव असलेले नेते, विविध मतदार गटांमध्ये मजबूत संपर्क आणि निवडणूक व्यवस्थापनाची भक्कम यंत्रणा आहे. या तुलनेत शिंदे गटाकडे प्रभावी नेतृत्व हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

# चेंबूर झाड दुर्घटनेचा अहवाल गुलदस्त्यात

## साकीनाका मॅनहोल दुर्घटनेचा अहवाल दोन महिने प्रलंबित

### विरोधकांकडून महापालिका प्रशासनावर टीका

**मुंबई :** चेंबूर येथे स्कूल व्हॅनवर पिंपळाचे झाड कोसळून विहान श्रीवास्तव (११) या विद्यार्थ्यांचा करुण अंत झाला तर साकीनाका येथे उघड्या मॅनहोल पडून अस्लम शेख (५५) यांचा मृत्यू झाला. या दोन्ही घटनांचा चौकशी अहवाल दोन महिने उलटले तरी गुलदस्त्यात आहे.

दरम्यान, चेंबूर दुर्घटनेची फेरचौकशी करण्यासाठी माजी कुलगुरु प्रा. डॉ. संजय देशमुख यांची एकसदस्यीय समिती म्हणून ३० जुलै रोजी नेमणूक करत एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे जाहीर केले. तर साकीनाकातील घटनेची चौकशी सात दिवसात करून त्याचा अहवालही सादर केला जाणार होता.

मात्र चेंबूर दुर्घटनेचा फेरचौकशी अहवाल तयार करण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार आहे, त्यामुळे अहवाल तयार करण्यासाठी वेळ मिळावा यासाठी देशमुख यांनी पत्र लिहिले असून मुदतवाढ देण्याबाबत विचार सुरू असल्याचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी सांगितले.

यंदाच्या पावसाळ्यात चेंबूर येथे स्कूल व्हॅनवर पिंपळाचे झाड कोसळले आणि विहानचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर साकीनाका येथील खैरानी रोडवर उघड्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम इसाक शेख (५५) यांचा २ जुलै रोजी मृत्यू झाल्याच्या घटनेला जवळपास दोन महिने उलटले असतानाही या प्रकरणातील उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल अद्याप सादर झालेला नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# डॉ. रुपनवर आत्महत्येची निष्पक्ष चौकशी करा!

**मुंबई :** फलटण (जि. सातारा) येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. राजेंद्र रुपनवर यांनी २७ ऑगस्ट रोजी सायन रेल्वे स्थानक परिसरात आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मुंबई महापालिकेच्या मार्ड संघटनेने केली आहे.

२७ ऑगस्ट रोजी सायन रेल्वे स्थानक परिसरात डॉ. रुपनवर यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर त्यांना उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ३१ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले.

संघटनेने म्हटले आहे की, "वैद्यकीय क्षेत्रातील एका तरुण डॉक्टरचा अशा प्रकारे मृत्यू होणे अत्यंत वेदनादायक आणि चिंताजनक आहे. या घटनेमागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसली तरी कामाच्या ठिकाणी कथित छळ तसेच बाह्य किंवा राजकीय दबाव असू शकतो."

## निवडक

### एसआरए प्रकल्पात ८५ लाखांची फसवणूक

**मुंबई :** एसआरए पुनर्विकास प्रकल्पात फ्लॅट देण्याचे आमिष दाखवून ६० वर्षीय व्यापाऱ्याची ८५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी 'झ्यूस हाऊसिंग'च्या प्रमोटर पूनम आशित दोषी यांच्यावर अँटॉप हिल पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. तक्रारदार तुषार पारेख यांनी सायन-कोळीवाडा येथील प्रकल्पात ८५ लाख रुपये देऊन 'प्रोग्रेसिव्ह को-ऑपरेटिव्ह बँक' सायन शाखेच्या तीन चेकद्वारे पैसे भरले होते.

### तुर्भे येथे १७.५ कोटींचा अन्नसाठा जप्त

**मुंबई :** अन्नपदार्थांच्या मुदत संपण्याच्या तारखा आणि घटकांची माहिती बदलून पुनर्विक्री करणाऱ्या तुर्भेतील 'साधना एंटरप्रायझेस'वर ठाणे एफडीए आणि नवी मुंबई गुन्हे शाखेने धाड टाकून १७.५२ कोटी रुपयांचा ४,९४२ कार्टन्स साठा जप्त केला आहे. यात लेझ, कुरकुरे, मॅगी, थम्स अप यांसारख्या लोकप्रिय ब्रँड्सचा समावेश आहे. याशिवाय १.३० लाख रुपयांचा मुदत संपलेला माल जप्त करण्यात आला असून, एफएसएसएआय परवाना नसल्याप्रकरणी युनिक फ्रॅग्रन्सेस, प्रिस्टिन वर्ल्डवाईड आणि विपुल दोषी या संस्थांमधूनही नमुने घेण्यात आले आहेत.

### रक्तपेढीचा परवाना एफडीएकडून निलंबित

**मुंबई :** मुंबई सेंट्रल येथील 'पश्चिम रेल्वे'च्या जगजीवन राम रुग्णालयातील रक्तपेढीचा परवाना अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी तात्पुरता निलंबित केला आहे. एफडीएच्या पाहणीत रक्तदानाच्या नोंदीतील त्रुटी, कर्मचाऱ्यांचा तुटवडा आणि साठवणुकीतील निष्काळजीपणा अशा १२ नियमांचे उल्लंघन आढळले होते.

### झोमॅटोवरून ॲनालॉग पनीर हटवले

**मुंबई :** अन्न सुरक्षा यंत्रणांच्या कडक कारवाईनंतर 'झोमॅटो'ने देशभरातील आपल्या प्लॅटफॉर्मवरून 'ॲनालॉग पनीर' आणि इतर ॲनालॉग डेअरी उत्पादने असलेले सर्व पदार्थ हटवले आहेत. कंपनीने यासाठी शून्य-सहनशीलता धोरण स्वीकारले आहे. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाची कारवाई आणि छत्तीसगड, मध्य प्रदेश व गुजरातमध्ये ॲनालॉग पनीरवर आलेल्या तात्पुरत्या बंदीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. झोमॅटोने सर्व रेस्टॉरंट्सना असे पदार्थ मेनूतून तत्काळ हटवण्याचे निर्देश दिले आहेत.


SIES College of Management Studies
RISE WITH EDUCATION

**SIES COLLEGE OF MANAGEMENT STUDIES**
NBA and NAAC Accredited
Approved by AICTE, New Delhi, DTE,
Govt. of Maharashtra and Affiliated to the University of Mumbai

**ADMISSION NOTICE : 2026-2028**
Invites application for
Seats remaining vacant after CAP rounds (if any)

| MASTER OF MANAGEMENT STUDIES (MMS) | MASTER OF COMPUTER APPLICATIONS (MCA) |
|---|---|
| (DTE Institute Code : MB-3109)<br>Educational qualifications: As per State CET Cell, Govt. of Mah. guidelines.<br>Last date of submission of forms : 8th September 2026 till 5 p.m.<br>Form Fees : Rs. 2500/-<br>Application forms available on institute website | (DTE Institute Code : MC-3109)<br>Educational qualifications: As per State CET Cell, Govt. of Mah. guidelines.<br>Last date of submission of forms : 8th September 2026 till 5 p.m.<br>Form Fees : Rs. 1500/-<br>Application forms available on institute website |

SRI CHANDRASEKARENDRA SARASWATHY VIDYAPURAM
Plot No 1E, Sector V, Nerul, Navi Mumbai 400 706
Tel: 61083425/61083430, E-mail: siescoms@sies.edu.in
Website:www.siescoms.edu.in


vedanta iron & steel

## VEDANTA IRON AND STEEL LIMITED

CIN: L24109MH2023PLC411777
**Regd. Office:** Vedanta Iron And Steel Limited, C-103, Atul Projects, Corporate Avenue New Link, Chakala MIDC, Mumbai, Maharashtra – 400 093
Telephone No.: +91 832 6713601 | E-mail: visl.cs@vedanta.co.in | Website: www.vedantaironandsteel.com

### NOTICE OF POSTAL BALLOT AND REMOTE E-VOTING

Notice is hereby given that pursuant to the provisions of Section 108 and Section 110 of the Companies Act, 2013 (**the "Act"**) read with Rules 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (**"Rules"**) and General Circular No. 03/2025 dated September 22, 2025 issued by the Ministry of Corporate Affairs read together with previous circulars issued by MCA in this regard (**"MCA Circulars"**), Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (**"SEBI Listing Regulations"**) and Secretarial Standards on General Meetings (**"SS-2"**) issued by the Institute of Company Secretaries of India (**"ICSI"**) and other applicable laws, rules and regulations (including any statutory amendment(s), modification(s) or re-enactment(s) thereof for the time being in force and as amended from time to time), Vedanta Iron And Steel Limited (**'the Company'**) is seeking approval of the equity shareholders (**'Members'**) of the Company by way of postal ballot through remote e-voting to transact the businesses set forth below:

| Sr. No. | Description of Resolution | Type of Resolution |
|---|---|---|
| 1. | Appointment of M/s S.R. Batliboi & Co. LLP, Chartered Accountants as the Statutory Auditors of the Company | Ordinary |
| 2. | To consider and approve 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Stock Option Plan 2026' and its implementation through Trust | Special |
| 3. | To consider and approve extension of 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Stock Option Plan 2026' to the employees of the holding company and subsidiary company(ies) of the Company | Special |
| 4. | To consider and approve secondary acquisition of shares through Trust for the implementation of 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Stock Option Plan 2026' | Special |
| 5. | To consider and approve provision of money by the Company for purchase of its own Shares through the Trust under the 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Stock Option Plan 2026' | Special |
| 6. | To consider and approve 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Share Purchase Plan 2026' and its implementation through Trust | Special |
| 7. | To consider and approve extension of 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Share Purchase Plan 2026' to the employees of the holding company and/or subsidiary company(ies) of the Company | Special |
| 8. | To consider and approve secondary acquisition of shares through Trust route for the implementation of 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Share Purchase Plan 2026' | Special |
| 9. | To consider and approve provision of money by the Company for purchase of its own Shares through the Trust under the 'Vedanta Iron And Steel Limited – Employee Share Purchase Plan 2026' | Special |
| 10. | To consider and approve material related party transaction(s) between the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 11. | To consider and approve material related party transaction(s) between Sesa Resources Limited ("SRL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 12. | To consider and approve material related party transaction(s) between Sesa Mining Corporation Limited ("SMCL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 13. | To consider and approve material related party transaction(s) between Bloom Fountain Limited ("BFL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 14. | To consider and approve material related party transaction(s) between ESL Steel Limited ("ESL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 15. | To consider and approve material related party transaction(s) between Western Cluster Limited ("WCL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |
| 16. | To consider and approve material related party transaction(s) between Desai Cement Company Private Limited ("DCCPL"), a material subsidiary of the Company and certain Identified Related Parties of the Company | Ordinary |

Pursuant to the above MCA Circulars, the Company has sent the Postal Ballot Notice along with the Explanatory Statement (**"Notice"**) only electronically to those Members whose names appear in the Register of Members or Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on the cut-off date i.e., **Friday, August 28, 2026 ("Cut-off Date")** received from the Depositories and whose e-mail address is registered with the Company/KFin Technologies Limited (**"KFin"**)/Depositories/Depository Participant (**"DPs"**) and the same has been completed on Monday, August 31, 2026. Accordingly, physical copies of the Notice, Postal Ballot Form and pre-paid business reply envelope are not being sent to the Members, and the communication of assent or dissent shall take place only through the remote e-voting system.

Members who have not received the Notice due to non-registration of their email addresses are requested to register or update their email addresses with their respective DPs.

The voting rights of the members shall be in proportion to their shares of the paid-up equity share capital of the Company as on the cut-off date. Any person who is not a shareholder of the Company as on the cut-off date shall treat the Postal Ballot Notice for information purpose only.

The Company has engaged KFin to provide the services of e-voting to the Members. The e-voting facility will be available during the following period:

| | |
|---|---|
| Commencement of e-voting | 09:00 A.M. (IST) on Tuesday, September 01, 2026 |
| End of e-voting | 05:00 P.M. (IST) on Wednesday, September 30, 2026 |

The remote e-voting facility shall be disabled immediately after 5:00 P.M. (IST) on Wednesday, September 30, 2026, and Members shall not be permitted to cast their votes thereafter. Voting rights of the Members shall be in proportion to the equity shares held by them in the paid-up equity share capital of the Company as on Cut-off date. Once vote on the resolution is cast, the Member will not be able to change it subsequently. Please note that communication of assent or dissent of the Members would only take place through the remote e-voting system. Only those Members whose names are recorded in the Register of Members/List of Beneficial Owners maintained by the Depositories as on the Cut-off date will be entitled to cast their votes by remote e-voting.

To facilitate Members to receive this Notice electronically, the Company has made arrangements with its RTA for registration of e-mail addresses in terms of the MCA Circulars. Members who have not registered their email IDs are requested to register the same through their DP if the shares are held in electronic mode and by writing an email from the registered email id to the Company at visl.cs@vedanta.co.in or to the Company's Registrar & Transfer Agent, KFin at einward.ris@kfintech.com or by dispatching the physical documents to Kfin address, in case the shares are held in physical mode.

The procedure to register e-mail address with the RTA and the procedure for remote e-voting is provided in the Notice.

The Board of Directors of the Company has appointed CS Shivaram Bhat (Membership No.: A10454, CP No.: 7853) as the Scrutinizer to conduct the postal ballot process in a fair and transparent manner and he has communicated his willingness to be appointed.

Members may note that the Notice will also be available on the Company's website at www.vedantaironandsteel.com, website of the Stock Exchanges, i.e., BSE Limited (**"BSE"**) and National Stock Exchange of India Limited (**"NSE"**) www.bseindia.com and www.nseindia.com, respectively and on the website of KFin at www.evoting.kfintech.com.

The Scrutinizer will submit his report to the Chairman or any authorised person of the Company and the results of the Postal Ballot will be announced within statutory timelines. The said results together with the Scrutinizer's Report, will be displayed at the Registered Office and Corporate Office of the Company and intimated to the NSE and BSE where the shares of the Company are listed. Additionally, the results will also be uploaded on the Company's website www.vedantaironandsteel.com and on the website of KFin evoting.kfintech.com.

In case of any queries, you may refer the Frequently Asked Questions (**"FAQs"**) and e-voting user manual for shareholders available at the download section of evoting.kfintech.com. In case of any queries/concern/grievances, you may contact Mr. Ganesh Chandra Patro, Deputy Vice President, KFin, Selenium, Tower B, Plot 31 & 32, Gachibowli, Nanakramguda, Serilingampally Mandal, Hyderabad – 500 032, India, at email: einward.ris@kfintech.com or 1800-309-4001 (toll free).

**Registered Office:**
**C-103 Atul Projects, Corporate Avenue New Link,**
**Chakala MIDC, Mumbai, Maharashtra, 400 093**
**CIN: L24109MH2023PLC411777**
**E-mail ID: visl.cs@vedanta.co.in**
**Website: www.vedantaironandsteel.com**
**Tel: +91 8326713601**

**By Order of the Board of Directors**
**for Vedanta Iron And Steel Limited**

**Tina Lakhani**
**Company Secretary & Compliance Officer**
**ACS No.: 34723**

**Place: Panaji-Goa**
**Date: September 01, 2026**